JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील शैक्षणिक समानतेकरिता सर्वसमावेशक शिक्षणाची तत्वे

**शैलेश रामचंद्र गायकवाड**
संशोधक प्रशिक्षणार्थी
क. का. स. वि. रामटेक

**डॉ. राजश्री मेश्राम**
शिक्षणशास्त्र विभाग प्रमूख
क. का. स. वि. रामटेक

**सारांश :–** सर्वसमावेशक शिक्षण म्हणजे शिक्षणप्रवाहात सर्वांचा समावेश करणारे व सर्वांना सहभागी करून घेणारे शिक्षण होय, विशेष शैक्षणिक गरज असणारी मुले, अपंग मुले यांचे शिक्षण हा सर्वसमावेशक शिक्षणाचा अविभाज्य घटक आहे. समाजातील दिव्यांग, शैक्षणिक अक्षम बालके, दुर्गम डोंगराळ, आदिवासी व झोपडपट्टी क्षेत्रातील मुले. वंचित मुले यांबाबत समाजाचा शिक्षणाबाबतचा दृष्टीकोन नकारात्मक होता वंचितांनाही सर्वसामान्यांबरोबर सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकार आहे याबाबत जागतिक स्तरावर अनेक धोरण कायदे जाहीर करण्यात आले. त्या अनुषंगाने भारत सरकारने स्थापन केलेल्या समित्या, कायदे उपयुक्त ठरतात. सर्वसमावेशक शिक्षण अधिक बळकट करण्याकरिता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये काही उद्दिष्टे ठरविण्यात आली असून त्या उद्दिष्टांच्या पूर्तते करिता काही तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. या तरतूदींचे प्रत्येकांनी सुयोग्य पणे पालन केल्यास वर्तमान परिस्थितीत समावेशक शिक्षण हे खऱ्या अर्थाने सर्वांसाठीचे शिक्षण होईल यात शंका नाही.

**शब्दसूची :–** शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, वंचित गट ,लिंगआधारित शिक्षण, सर्वसमावेशकता, अंमजबजावणी

**1.1 प्रस्तावना :–**

भारतीय राज्यघटनेच्या 45 व्या कलमान्वये 14 वर्ष वयोगटापर्यंतच्या सर्व बालकांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले आहे. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातून देशातील प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी शासनाने विविध योजना व प्रकल्प राबविलेले आहेत. मात्र शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाचे प्रमाण हवे तेवढे साध्य झालेले आपणास दिसत नाही. भारतातील कोणताही बालक शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 हा सर्वमान्य झालेला आहे. त्याची अंमलबजावणीही सुरू झालेली आहे. परंतू अजूनही दुर्गम, डोंगराळ, आदिवासी व झोपडपट्टीत राहणारी व वंचित घटकातील मुले शिक्षणापासून वंचित असल्याचे चित्र आपणास पहावयास मिळते. अनेक विशेष घटक शिक्षणापासून वंचित राहत आहेत. त्यात विशेष शैक्षणिक गरजा व दिव्यांग असणारी मुले व मुली यांचाही समावेश आहे. या सर्व विशेष घटकांना सर्वसामान्य मुलांबरोबर शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या सघी वेगवेगळया मार्गाने व पद्धतीने उपलब्ध करून देणे म्हणजेच सर्वसमावेशक शिक्षण होय.

**1.2 सर्व समावेशक शिक्षणाचा अर्थ :–**

21 व्या शतकांत समावेशक शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आलेले असून त्यामूळे शिक्षणप्रवाहापासून दूर राहिलेला वर्ग शिक्षणाच्या प्रवाहात येत आहे. 1991 च्या आंतरराष्ट्रीय अपंग वर्षापासून या संकल्पनेस चालना मिळू लागली. 1990 मध्ये थायलंड मधील जोमथियम येथील परिषदेत समावेशक शिक्षणाची गरज या विषयावर चर्चा होऊन ही संकल्पना जागतिक स्तरावर मांडण्यात आली. शिक्षणप्रवाहात सर्वांचा समोवश म्हणजे समावेशक शिक्षण होय. 1984 मध्ये समावेशक शिक्षण संकल्पना स्पेनमधील Salamacha शहरांत झालेल्या परिषदेत ही संकल्पना उदयास आली म्हणून त्यास Salamcha statement असेही म्हणतात. सर्वसमावेशक शिक्षण म्हणजे शिक्षणप्रवाहात सर्वांचा समावेश करणारे व सर्वांना सहभागी करून घेणारे शिक्षण होय, विशेष शैक्षणिक गरज असणारी मुले, अपंग मुले यांचे शिक्षण हा सर्वसमावेशक शिक्षणाचा अविभाज्य घटक आहे. आज भारतामध्ये अनेक वर्षापूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या विशेष गरजा असलेल्यांच्या वेगळया शाळांचा दृष्टीकोन मागे पडून त्यांचाही सर्वसामान्यांच्या शाळेतच समावेश करून त्यांचा मानसिक, बौध्दिक आर्थिक, सांस्कृतिक असा भेद न करता सर्वांनाच एकसारखे एकत्रित शिक्षण देणे सुरु झाले आहे व त्यासाठी अशा विदयार्थ्यांना पुढील काही सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

1) शिक्षणासाठी शैक्षणिक साहित्य 2) गणवेश पुस्तकं 3) शिक्षणासाठी प्रवास व्यवस्था 4) शिष्यवृत्ती 5) नोकरी मिळविण्यासाठी सहकार्य 6) अपंगत्त्वानुसार योग्य मूल्यांकन करण्याची पध्दती.

**1.3 सर्वसमावेशक शिक्षणाची संकल्पना**

21 वे शतक हे आधुनिक तंत्रज्ञानाचे शतक आहे यामुळे शिक्षण क्षेत्रात दररोज नविन संकल्पना उदयास येतात. त्यातीलच एक म्हणजे समावेशक शिक्षण (Inclusive Education) ही नवीन संकल्पना उदयास आली आहे. 'समावेशक शिक्षण' या नावातच या संकल्पनेची व्याप्ती दडलेली आहे. सर्वांना सामावून घेण्याचे उद्दिष्ट साध्य करणारी ही शिक्षणप्रणाली विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) त्यांच्या हक्काची, प्रेमाची शाळा मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. थॉमस (1991) यांच्या मते ''समावेशन म्हणजे शिक्षण पद्धतीच्या मुख्य धारेत सर्वाचा स्वीकार, त्या सर्वांना शिकविताना सामान्य शिक्षणाच्या चौकटीत शिकविले गेले पाहिजे. समावेशक शिक्षण म्हणजे समाजातील सर्व मुलांसाठी जाणीवपूर्वक प्राथमिक शाळेची केलेली अशी रचना की, ज्या ठिकाणी सर्व प्रकारच्या मुलांच्या शिक्षणाची सोय होऊ शकेल.

सर्वसमावेशक शिक्षणाची संकल्पना 1960 साली बऱ्याच देशांतून अस्तित्वात आली. 1990 साली थायलंडमधील जोमथियम येथे जागतिक स्तरावरील परिषद झाली या परिषदेत सर्वसमावेशक शिक्षणाची गरज या विषयावर चर्चा होऊन ही संकल्पना जागतिक स्तरावर मांडण्यात आली 1994 साली भारतानेही हा विचार व संकल्पना मान्य केली.

**1.4 प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे**

1. समावेशक शिक्षणा संदर्भात विविध अयोगाची धोरणे जाणून घेणे.
2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील शैक्षणिक समानता निर्माण करण्यासंदर्भातील उपक्रम व तरतूदी जाणून घेणे.
3. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील उच्च शिक्षणातील समता आणि समावेशकतेकरिता शासनाने करावयाची कार्यवही जाणून घेणे.

➢ **विश्लेषण**

**1.4.1 उद्दिष्ट क्र. 1 चे विश्लेषण**

समाजातील दिव्यांग, शैक्षणिक अक्षम बालके, दुर्गम डोंगराळ, आदिवासी व झोपडपट्टी क्षेत्रातील मुले. वंचित मुले यांबाबत समाजाचा शिक्षणाबाबतचा दृष्टीकोन नकारात्मक होता वंचितांनाही सर्वसामान्यांबरोबर सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकार आहे याबाबत जागतिक स्तरावर अनेक धोरण कायदे जाहीर करण्यात आले. त्या अनुषंगाने भारत सरकारने स्थापन केलेल्या समित्या, कायदे उपयुक्त ठरतात.

समावेशक शिक्षणासंदर्भात जागतिक स्तरावर यासबंधी काही धोरणे आखली गेली ती म्हणजे 'मानवी जाहीरनामा (1948) व सालमनका निवेदन (1994). भारतात सुद्धा यासंबंधी काही धोरणे आखली गेली.

**1 भारतीय शिक्षण आयोग (1964–1966)** – या आयोगात विकलाग विद्यार्थ्यांना सामान्य शाळेत दाखल करून घ्यावे व तीव्र स्वरूपाच्या विकलांग विद्यार्थ्याकरिता जिल्हास्तरावर शाळा उपलब्ध करून गाव्या अशा शिफारशी करण्यात आल्या होत्या

**2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (1986)** – या धोरणानुसार दिव्यांग विद्यार्थ्यासाठी एकात्म शिक्षण सुरु करण्यात आले.

**3. राष्ट्रीय अभ्यासक्रम रूपरेषा (2000)** – इ.स. 2000 मध्ये राष्ट्रीय अभ्यासक्रम रूपरेषा ठरविण्यात आली यामध्ये विशेष गरजा असणान्यर चालकाच्या संदर्भात शिक्षकारिता संवातर्गत प्रशिक्षणामधून शिक्षकामध्ये दिव्यांग मुलाविषयी संवेदना निर्माण करणे त्यांच्या करिता विशेष साहित्य निर्माण करण त्यांच्या मदती करिता सामाजिक संसाधनांचा वापर करणे या कडे लक्ष वेधण्यात आले होते.

**4. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (2005)** – या आराखडयात दिव्यांग ही एक सामाजिक जबाबदारी – आहे तिचा स्किार करावा, प्रवेश देताना विशेष गरजा असणाऱ्या बालकांना नाकारू नये उलट त्यांना सर्वसामान्य मुलांच्या शालेय कार्यक्रमामध्ये या मुलाचा समावेश करण्यात यावा या विषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे

**5. शिक्षण हक्क कायदा 2009 च्या शिफारशी**

भारत सरकारने 26 ऑगस्ट 2009 रोजी बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 हा कायदा केला तो 1 एप्रिल 2010 पासून संपूर्ण देशात लागू करण्यात आलेला आहे त्यातील तरतुदी म्हणजे, भाग–3 कलम 4 नुसार राज्यशासन किया स्थानिक प्राधिकरणाने दिव्यांग बालकांना शाळेत जाता यावे व प्राथमिक शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी सुरक्षित परिवहन व्यवस्था करेल, भाग–3 कलम 9 नुसार दिव्यांग बालकांना शाळेमध्ये शिक्षण घेणे शक्य नसल्यास अशा बालकांना निवासाच्या ठिकाणी विशेष सुविधांची उपलब्धता करून देणे, भाग–5 कलम 21 नुसार दिव्यांग बालक ओळखणे य त्यांना अध्ययनामध्ये मदत कावी म्हणून अध्ययन साहित्य निर्माण कराये प्राथमिक शिक्षणातील त्यांच्या सहभागाची व प्राथमिक शिक्षण पूर्ण करीत असल्याबाबत

खातरजमा करणे, भाग–8 कलम 34 राज्य सल्लागार परिषदेवर सदस्य म्हणून विशेष गरजा असलेल्या मुलाच्या शिक्षणाचे विशेषीकृत ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्तीची नेमणूक करणे अशा महत्वपूर्ण बाबींचा समावेश आहे.

**1.4.2 उद्दिष्ट क्र. 2 चे विश्लेषण**

सर्वसमावेशक शिक्षण अधिक बळकट करण्याकरिता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये काही उद्दिष्टे ठरविण्यात आली असून त्या उद्दिष्टांच्या पूर्तते करिता काही तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. या धोरणातील काही ठळक उपक्रम व तरतुदी पुढीलप्रमाणे आहेतः

1 राष्ट्रीय शैक्षणिक माहिती संग्रहामध्ये (NDOED) (नॅशनल डिपॉझिटरी ऑफ एज्युकेशनल डेटा) प्रत्येक विद्यार्थ्यांची संपूर्ण व अद्ययावत माहिती जतन करण्यात येईल. केंद्रीय शैक्षणिक सांख्यिकी विभागाकडून (CESD) (सेंट्रल एज्युकेशनल स्टॅटिस्टिक्स डिव्हिजन) सदर माहितीचे विश्लेषण करण्यात येईल

2 भारतीय शिक्षण व्यवस्था आणि लागोपाठच्या सरकारी धोरणांनी शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरामधील लिंग आधारित आणि सामाजिक श्रेणीतील अंतर दूर करण्याच्या दृष्टीने स्थिर प्रगती केली असली तरीही, शिक्षणाच्या बाबतीत ऐतिहासिकदृष्ट्या उपेक्षित असलेल्या सामाजिक–आर्थिकदृष्ट्या पंचित गटामध्ये (Social Economical Disadvantage Group), अजूनही मोठी असमानता कायम आहे विशिष्ट SEDG साठी कोणत्या उपाययोजना विशेषत परिणामकारक आहेत हे निश्चित करणारे संशोधनसुद्धा विचारात घेतलेले आहे उदा सायकली पुरवणे आणि मुलांनी शाळेत यावे म्हणून सायकल चालवणाऱ्याने आणि चालत येणाऱ्यांचे गट तयार करणे या गोष्टी विशेषत विद्यार्थिनींचा अगदी कमी अंतर असले तरीसुद्धा सहभाग वाढवण्यासाठी परिणामकारक पद्धती असल्याचे दिसून आले आहे कारण त्यातून मिळणारा सुरक्षेचा फायदा आणि पालकाना मिळणारा दिलासा महत्वाचा आहे.

3. अपंगत्व असलेल्या विशिष्ट मुलाना शिक्षण उपलब्ध होण्यासाठी एकास एक शिक्षक आणि प्रशिक्षक सहाध्यायीनी शिकवणे, ओपन स्कूलिंग योग्य पायाभूत सुविधा आणि सुयोग्य तात्रिक हस्तक्षेप या गोष्टी विशेष परिणामकारक ठरू शकतात आर्थिकदृष्ट्या यचित कुटुंबांमधील मुलासाठी चांगल्या दर्जाचे ECCE (Early childhood care and education) पुरवणाऱ्या शाळा खूप उपयोगी पडू शकतात दरम्यान विद्यार्थी, पालक, शाळा आणि शिक्षक यांच्याबरोबर उपस्थिती आणि अध्ययनातील निष्पत्ती सुधारण्यासाठी काम करणारे समुपदेशक किंवा चांगल्या प्रकारे प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्ते विशेषत शहरी गरीब भागात परिणामकारक असल्याचे दिसून आले आहे. अशा भागात विशेष शैक्षणिक विभाग (SEZ Special Education Zones) जाहीर करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. त्यानुसार या भागातील शैक्षणिक चित्र बदलण्यासाठी तिथे सर्व योजना आणि धोरणे एकत्रित प्रयत्नांच्या माध्यमातून राबविण्यात येतील.

4. याशिवाय सर्व मुलीना आणि ट्रान्सजेडर विद्यार्थ्यांना न्याय्य गुणवत्तापूर्ण शिक्षण पुरवण्याची देशाची क्षमता तयार करण्यासाठी भारत सरकार लिंग–समावेश निधी तयार करेल मुलीना आणि ट्रान्सजेडर विद्यार्थ्यांना शिक्षण मिळण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाच्या म्हणून निश्चित केलेल्या प्राधान्याची अमलबजावणी करण्यासाठी (उदा स्वच्छता आणि शौचालयाची सुविधा सायकली रोख रकम हस्तांतरण राज्याना हा निधी उपलब्ध असेल मुलीना आणि ट्रान्सजेटर विद्यार्थ्यांना शिक्षणाला प्रवेश मिळण्यासाठी आणि शिक्षणात सहभागी होण्यासाठी स्थानिक सदभांतील विशिष्ट अडथळ दूर करण्यासाठी समुदाय आधारित हस्तक्षेपांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यांचे प्रमाण वाढवण्यासाठीसुद्धा हा निधी राज्यांना सक्षम करेल.

5. ज्या शाळांच्या ठिकाणी मुलांना फार दुरून यावे लागते त्याच्यासाठी, आणि विशेषतः सामाजिकदृआर्थिकदृष्ट्या वंचित पार्श्वभूमीमधून आलेल्या मुलांसाठी जवाहर नवोदय विद्यालयांच्या दर्जाच्या सर्व विद्यार्थ्यांच्या विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेची योग्य व्यवस्था असलेल्या मोफत यसतिगृह सुविधा बांधल्या जातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये मजबूत केली जातील आणि चांगल्या दर्जाच्या शाळांमधील (इयत्ता 12 वी पर्यंत) सामाजिक–आर्थिकदृष्ट्या यचित पार्श्वभूमीमधून आलेल्या मुलीचा सहभाग वाढवण्यासाठी या विद्यालयाचा विस्तार केला जाईल उच्च दर्जाच्या शैक्षणिक संधी वाढवण्यासाठी देशभर विशेषत महत्त्वाकांक्षी जिल्हामध्ये खास शैक्षणिक विभागांमध्ये आणि इतर वचित भागामध्ये अतिरिक्त जवाहर नवोदय विद्यालये आणि केंद्रिय विद्यालये बांधली जातील. प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणाचे किमान एक वर्ष पूर्ण करणाऱ्या शाळा पूर्व विभाग देशभरातील विशेषत वंचित भागातील केंद्रिय विद्यालयांना आणि इतर प्राथमिक शाळांना जोडला जाईल,

6 ECCE आणि शालेय प्रणालीत दिव्यांग मुलाचा समावेश आणि समान सहभाग सुनिश्चित करण्यालासुद्धा सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल दिव्यांग विद्यार्थ्यांना पायाभूत स्वरापासून उच्च शिक्षणापर्यंत सामान्य शालेय प्रक्रियेत पूर्णपणे सहभागी होता येईल यासाठी त्यांना सक्षम केले जाईल. अपंग व्यक्ती अधिकार कायदा 2016 (RPWD) (Rights of Persons with Disablities Act 2016) मध्ये समावेशक शिक्षणाची व्याख्या शिक्षणाची अशी प्रणाली की जिथे अपगत्य असलेले आणि नसलेले एकत्रितपणे शिकतात आणि अध्यापन आणि अव्ययनाची पद्धत वेगवेगळ्या प्रकारच्या अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गरजाना विचार करून योग्यरीत्या बदललेली असते अशी करण्यात आलेली आहे हे धोरण RPWD कायदा 2016 शी पूर्णपणे सुसंगत आहे आणि शाळेसबंधी या

कायगाच्या सर्व शिफारसीना पूर्णपणे पाठिबा देते राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार करताना NCERT आणि DEPWD (Department of Empowerment of Persons with Disabilities) च्या राष्ट्रीय संस्थासारख्या तज्ञ संस्थाशी सल्लामसलत केली जाईल.

**1.4.3 उद्दिष्ट क्र. 3 चे विश्लेषण**

उच्च शिक्षणातील समता आणि समावेशकता – चांगल्या दर्जाच्या उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळाल्यावर अनेक शक्यतांचे भांडार खुले होते, त्यामुळे व्यक्ती आणि समुदाय हे दोन्हीही बंचिततेच्या दुष्टचक्रातून बाहेर पडू शकतात. याच कारणासाठी, चांगल्या दर्जाच्या उच्च शिक्षणाच्या संधी सर्व व्यक्तींना उपलब्ध करून देणे, हे सर्वोच्य प्राधान्यांपैकी एक असले पाहिजे, हे धोरण SEDG वर विशेष भर देतानाच, सर्व विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाच्या उच्च शिक्षणाला समान प्रवेश मिळेल, हे सुनिश्चित करते. काही घटक विशेषतः किंवा लक्षणीयरीत्या उच्च शिक्षणाच्या बाबतीत जास्त तीव्र आहेत. त्यांच्यावर विशिष्ट उपाय काढले पाहिजेत या घटकांमध्ये उच्च शिक्षणातील संधींच्या माहितीचा अभाव, उच्च शिक्षण घेण्याच्या आर्थिक अपॉरच्यूनिटी कॉस्ट, आर्थिक मर्यादा, प्रवेश प्रक्रिया, भौगोलिक आणि भाषिक अडथळे, अनेक उच्च शिक्षण कार्यक्रमांची रोजगार मिळवून देण्याची कमी क्षमता आणि विद्यार्थी सहाय्याच्या योग्य प्रणालींचा अभाव यांचा समावेश आहे.

या हेतूसाठी, उच्च शिक्षणाशी संबंधित विशिष्ट कृती सर्व सरकारे आणि HEI करतील

- **सरकारांनी उचलायची पावले**

प्रत्येक राज्य सरकारांनी उचलायची पावले

अ) महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये आणि जास्त संख्येने SEDG असलेल्या खास शैक्षणिक विभागांमध्ये उच्च दर्जाच्या अधिक HEI स्थापन करून प्रवेश संख्या सुधारणे.

ब) स्थानिक/भारतीय भाषांमध्ये किंवा दोन भाषांमध्ये शिकवणारा HEIS ना अधिक आर्थिक मदत आणि शिष्यवृत्त्या देणे.

क) सरकारी आणि खाजगी दोन्ही HEIs मधील SEDG ना अधिक आर्थिक मदत आणि शिष्यवृत्त्या देणे

ड) उच्च शिक्षणातील संधीविषयी आणि SEDG साठीच्या शिष्यवृत्त्यांविषयी प्रसार कार्यक्रम तयार करणे

ई) अधिक सहभागासाठी आणि अध्ययन निष्पत्तींसाठी तंत्रज्ञान साधने विकसित करणे आणि त्यांना सहाय्य करणे.

- सर्व HEIs नी उचलायची पावले

1) उच्च शिक्षण घेण्यासाठी असणाऱ्या संधीचा खर्च आणि शुल्क यासाठी होणारी आर्थिक हानी कमी करणे.
2) सामाजिक–आर्थिकदृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांसाठी अधिक आर्थिक मदत पुरवणे.
3) उच्च शिक्षणाच्या संधी आणि शिष्यवृत्त्यांचा प्रसार करण्यासाठी कार्यक्रम करणे,
4) प्रवेश प्रक्रिया अधिक सर्वसमावेशक करणे.
5) अभ्यासक्रम अधिक सर्वसमावेशक करणे.
6) उच्च शिक्षण कार्यक्रमांची रोजगार क्षमता वाढवणे.
7) भारतीय भाषांमध्ये आणि दोन भाषांमध्ये शिकवले जाणारे अधिक पदवी अभ्यासक्रम विकसित करणे.
8) सर्व इमारती आणि सुविधा व्हील चेअरवरून प्रवेश करण्यासाठी आणि दिव्यांग लोकांसाठी सुलभ असतील, हे सुनिश्चित करणे.
9) वंचित शैक्षणिक पार्श्वभूमीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सांधणारे अभ्यासक्रम विकसित करणे.
10) सुयोग्य समुपदेशन आणि मार्गदर्शन कार्यक्रमांद्वारे अशा सर्व विद्यार्थ्यांना सामाजिक–भावनिक आणि शैक्षणिक आधार देणे तसेच मार्गदर्शन करणे.
11) लिंग–ओळख समस्या आणि अभ्यासक्रमासह HEI's च्या सर्व पैलूंमध्ये तिच्या समावेशाबद्दल सर्व शिक्षक, समुपदेशक, आणि विद्यार्थ्यामध्ये संवेदनशीलता निर्माण करणे,
12) भेदभाव विरोधी आणि छळवणूक विरोधी सर्व नियम काटेकोरपणे लागू करणे.
13) SEDG चा सहभाग वाढवण्यासाठी कृती करण्याकरता विशिष्ट योजना असलेल्या संस्थात्मक विकास योजना बनवणे. यामध्ये वरील सर्व मुद्दे समाविष्ट असतील, पण योजना या मुद्द्यांपुरतीच मर्यादित नसेल.

**1.5 निष्कर्ष –**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील उद्दिष्टांच्या पूर्तते करिता करण्यात आलेल्या तरतूदी नुसार .अपंगत्व असलेल्या विशिष्ट मुलाना शिक्षण उपलब्ध होण्यासाठी एकास एक शिक्षक आणि प्रशिक्षक सहाध्यायीनी शिकवणे, ओपन स्कूलिंग योग्य पायाभूत सुविधा आणि सुयोग्य तात्रिक हस्तक्षेप या गोष्टी विशेष परिणामकारक ठरू शकतात. सर्व मुलीना आणि ट्रान्सजेडर विद्यार्थ्यांना न्याय्य गुणवत्तापूर्ण शिक्षण पुरवण्याची देशाची क्षमता तयार करण्यासाठी भारत सरकार लिंग–समावेश निधी तयार करेल सोबतच ECCE आणि शालेय प्रणालीत दिव्यांग मुलाचा समावेश आणि समान सहभाग सुनिश्चित करण्यालासुद्धा सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल दिव्यांग विद्यार्थ्यांना पायाभूत स्वरापासून उच्च शिक्षणापर्यंत सामान्य शालेय प्रक्रियेत पूर्णपणे सहभागी होता येईल यासाठी त्यांना सक्षम केले जाण्यावर भर देण्यात आला आहे. महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये आणि जास्त संख्येने SEDG असलेल्या खास शैक्षणिक विभागांमध्ये उच्च दर्जाच्या अधिक HEI स्थापन करून प्रवेश संख्या सुधारणे. सर्व विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाच्या उच्च शिक्षणाला समान प्रवेश मिळेल याची व्यवस्था व सुयोग्य समुपदेशन आणि मार्गदर्शन कार्यक्रमांद्वारे अशा सर्व विद्यार्थ्यांना सामाजिक–भावनिक आणि शैक्षणिक आधार देणे हे सुनिश्चित करण्यात आलेले आहे.

**संदर्भ सूची**


1. मनुष्यबळ विकास मंत्रालय अहवाल (मराठी),नवी दिल्ली/ मुंबई, 29 जुलै 2020.
2. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार
3. शिंदे मंदार, (17/08/2020), राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, शालेय शिक्षण सारांश, http://aisiakshare.blogspot.com
4. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2019, मसुदा सारांश–www.mhrd.gov.in
5. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 – vikipedia, Ministry of Electronic and Information Technology, Government of India .
6. मानकर गणेश, (30 जानेवारी 2022), राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, byjusexamprep.com
7. भोले रजत, (31 जूलै 2020), शिक्षणाचा नवा अध्याय, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, www.missionmpsc.com
8. लक्ष्मीकांत देशमुख, नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 : एक चिकित्सक अभ्यास, आंतरभारती शाखा पूणे,
9. NEP 2020 and Online Education – A Paradigm Shift, https://www.highereducationdigest.com